स्मृती क्षण

१३ ऑक्टोबर ही किशोरकुमारांची पुण्यतिथी. १९८७ साली याच दिवशी किशोरजींनी या जगाचा निरोप घेतला. ५७ वर्षांच्या आयुष्यात त्यांनी अनेक चढ-उतार पाहिले. मध्यप्रदेशातील खंडवा गावी जन्मलेले किशोरजी वयाच्या १८व्या वर्षी आपल्यापेक्षा १९वर्षांनी मोठ्या भावाबरोबर(अशोककुमार) मुंबईला आले. त्यांचं खरं नाव होतं आभास गांगुली. गायक बनण्याची त्यांची तीव्र इच्छा होती पण गाण्याचं प्रशिक्षण घेतलेलं नव्हतं. आणि आपल्याप्रमाणे धाकट्या भावानेही अभिनयात यावं अशी दादामुनींची इच्छा होती. त्यामुळे काहीशा अनिच्छेनेच त्यांनी अभिनयात पदार्पण केलं. तरी त्यांचं मन अभिनयात रमत नव्हतं. त्यातून सुटका व्हावी यासाठी वाईट अभिनय(वेड्यासारखा) करायला सुरुवात केली. पण दर्शकांना गंभीर आणि पोक्त अभिनेत्यांच्या गर्दीत किशोरदांचा हा विचित्र अभिनयच



अधिक आवडू लागला. *नई दिल्ली* आणि *आशा*('इना मिना डिका...')सारख्या चित्रपटांमधून किशोरकुमारांची गायकी, अभिनय आणि नृत्यशैली अनोखी असल्यामुळेच दर्शकांना वेड लावणारी ठरली.

हिंदी चित्रपटक्षेत्रात विनोदी कलाकारांच्या वाट्याला इतका आदर क्वचितच येत असेल. मेहमूद आणि नंतर किशोरकुमार यांना कॉमेडी आर्टीस्ट असूनही हिरोपेक्षा अधिक आदर आणि चाहत्यांचं प्रेम लाभलं. इतकं की अभिनेत्री नर्गीसनेही एकदा आपल्या आवडत्या कलाकाराविषयी सांगताना किशोरकुमारचं नाव घेतलं होतं.

१९५०मध्ये रुमादेवीबरोबर लग्न केल्यामुळे त्यांना आपल्या कुटुंबातून बाहेर पडावं लागलं. १९५८मध्ये *चलती का नाम गाडी* सिनेमा आला, त्यानंतर मधुबालाबरोबर त्यांचे संबंध निकटचे होऊ लागले. त्यामुळे रुमादेवीपासून ते विभक्त झाले.(आजचे गोविंदा, आमीर, सैफ यांच्यासारखी पूर्वीच्या कलाकारांच्या लग्न जीवनात वादळं नव्हती हे विधान खरं आहे?) मधुबालाच्या हृदयाला छिद्र होतं. त्यामुळे ती या लग्नसंबंधांबाबत उदासिनच होती. पण तरीही त्यांनी तिची अखेरपर्यंत साथ दिली. १९६९मध्ये मधुबालाचं निधन झालं. तोपर्यंत किशोरकुमारांचे *पडोसन*(१९६८)सारखे एकापेक्षा एक हिट सिनेमे पडद्यावर आले होते.


त्यांना गायकीत पुढे आणण्याचं श्रेय एस. डी. बर्मन आणि आर. डी. बर्मन यांना द्यायला हवं. अशोककुमार यांच्या घरात एस. डी.नी किशोरकुमारांना गाताना ऐकलं. ते बाथरूममध्ये वरच्या पट्टीत सायगलांचं कुठलंतरी गाणं गात होते. त्यावेळी सचिनदांनी त्यांना सल्ला दिला, 'तू चांगला गातोस. पण दुसऱ्याची नक्कल करून माणूस मोठा होत नाही. तू स्वतःची शैली विकसित कर.' याच किशोरकुमारांनी पुढे स्वतःची खास शैली विकसित केली आणि तत्कालिन गायक महंमद रफी, मुकेश, तलत मेहमूद, मन्ना डे आणि हेमंतकुमार वगैरेंच्या काळात आपल्या गायनाचा वेगळा ठसा उमटवला. इतकंच नाही तर याच शैलीच्या आधारावर त्यांनी श्रेष्ठ गायक म्हणूनही मानाचं स्थान मिळवलं.

किशोरकुमारः

जिंदगी का सफर है ये कैसा सफर

*आराधना*मध्ये राजेश खन्नासाठी 'मेरे सपनों की रानी...'सारखी गाणी गायली. त्या सिनेमाने राजेश खन्नाला सुपरस्टार केलं, तर वॉईस ऑफ राजेश म्हणून किशोरकुमारांना सुपर सिंगर ठरवलं.अर्थात ते फक्त वॉईस ऑफ राजेश खन्नाच नव्हते तर, देव आनंद आणि नवोदित अमिताभ बच्चनसाठीही त्यांनी आवाज दिला. १९८०मध्ये काही गैरसमज झाल्यामुळे त्यांनी अमिताभ बच्चनसाठी गाणं म्हणणं बंद केलं. त्याच सुमारास अमिताभच्या कारकीर्दीलाही घसरण लागली. आणि त्यामागे किशोरकुमारांचा आवाज नसणं हेही एक महत्त्वाचं कारण असू शकतं, असं अनेकांना वाटू लागलं.

खाजगी जीवनात १९६९मध्ये मधुबालाच्या मृत्यूनंतर त्यांनी १९७५साली योगीता बालीशी लग्न केलं. पण हे संबंधही फक्त तीन वर्षं टिकले. त्यानंतर १९८०मध्ये ते लीना चंदावरकरबरोबर विवाहबद्ध झाले. लीनाने मात्र किशोरदांना अखेरपर्यंत साथ दिली. मुंबईत मृत्यूशय्येवर असलेल्या किशोरदांचे शेवटचे शब्दही त्यांच्या व्यक्तिमत्वाला साजेसेच होते. ते म्हणाले, 'किशोरकुमार सिर्फ खंडवा में मर सकता है.' किशोरदांच्या स्मृती आजही त्यांच्या चाहत्यांच्या मनात तेवढ्याच जीवंत आहेत.



मैं हूं झुम झुम झुम झुम झुमरू...

छायाः सौजन्य द हंड्रेड ल्युमिनरीस ऑफ हिंदी सिनेमा